॥ श्री गणेशाय नमः ॥
कुणाल वधवा
9765595037
9405171771
# श्रीराम बोरवेल्स
जमीन, घर, शेती यावर
४.७५, ५ व ६ इंची बोर करुन मिळेल.
तसेच सबमर्सिबल पंप बसवून मिळेल.
१४, राधाकृष्णन शॉपींग सेंटर, झाशी राणी चौक, मनपाजवळ, धुळे

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.२७४ ■ मंगळवार ७ जुलै २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.NO./DHL/53/24-26

डॉ.गौतम शाह धुळ्यात उपलब्ध
गुडघे दुखी, कंबरदुखी, स्लीप डिस्क, संधीवात, सायटीका या रुग्णावर ओझोन थेरपी व गुडघ्याची इंजेक्शन थेरपीने यशस्वी उपचार
दि.६ जुलै ते १० जुलै २०२६ या कालावधीत धुळे येथे उपलब्ध असणार आहेत. स.१० ते २ दु.
संपर्क :- डॉ.गौतम शाह M.S. (ऑर्थो) शाह क्लिनिक
श्री.विठ्ठल हॉस्पीटल, जुने आस्था हॉस्पीटल, रामवाडीसमोर, मालेगावरोड, धुळे (फोन नं.०२५६२-२३५११३)
भ्रमणध्वनी-०८६००३५१०००/९८८१२७८६९८

### त्र्यंबकेश्वरला ढगफुटीची शक्यता

# महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा कहर; पुन्हा रेड अलर्ट
# खासगी कंपन्यांना शासनाने दिले वर्क फ्रॉम होमचे निर्देश



**मुंबई, दि.६- गेल्या तीन दिवसांपासून महाराष्ट्राच्या विविध भागांत सुरू असलेल्या मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत केले आहे. विशेषतः मुंबई महानगर क्षेत्रात पावसाचा जोर कायम असून अनेक सखल भागांमध्ये पाणी साचले आहे. हवामान विभागाने मुंबईसह ठाणे आणि रायगड जिल्ह्यांसाठी रेड अलर्ट जारी केला आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकार आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सतर्क झाल्या असून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वाचे निर्देश जारी करण्यात आले आहेत.**

राज्यातील पावसाची गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने सोमवार, ६ जुलै २०२६ रोजी विविध खबरदारीच्या उपाययोजना जाहीर केल्या आहेत. मुंबईतील खासगी आस्थापनांना शक्य असल्यास आपल्या कर्मचाऱ्यांना वर्क फ्रॉम होमची सुविधा उपलब्ध करून देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मुसळधार पावसाच्या काळात अनावश्यक प्रवास कमी करणे आणि वाहतूक व्यवस्थेवरील ताण कमी करणे हा या निर्णयामागील प्रमुख उद्देश आहे.

अत्यावश्यक सेवा वगळता इतर सरकारी आणि निम-सरकारी कार्यालयांबाबतही खबरदारीचे निर्देश देण्यात आले आहेत. कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा विचार करून दुपारनंतर अर्ध्या दिवसाची सुट्टी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच मुंबई, ठाणे आणि लगतच्या परिसरातील शाळा आणि महाविद्यालयांना खबरदारीचा उपाय म्हणून सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

**मुंबई, ठाणे आणि रायगडला रेड अलर्ट**

हवामान विभागाने मुंबई, ठाणे आणि (पान ४ वर)

### राम मंदिर ट्रस्ट
## चंपतराव व मिश्रांचा अखेर राजीनामा मंजूर



दिल्ली, दि.६- राम मंदिर ट्रस्टने सोमवारी देणगी चोरीच्या पार्श्वभूमीवर सरचिटणीस चंपत राय आणि सदस्य अनिल मिश्रा यांचे राजीनामे मंजूर केले. कोषाध्यक्ष गोविंद गिरी यांनी याबाबत माहिती दिली असून कृष्ण मोहन यांच्याकडे राममंदिर ट्रस्टचे अंतरिम सरचिटणीस म्हणून अतिरिक्त जबाबदारी सोपवण्यात आली आहे. नवीन विश्वस्ताच्या नियुक्तीबाबत निर्णय घेण्यासाठी ट्रस्टची २२ जून रोजी पुन्हा बैठक होईल.

श्रीरामजन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टची बैठक दुपारी तीन वाजता रामजन्मभूमी (पान ४ वर)

# त्र्यंबकेश्वर ते नाशिक दरम्यान ढगफुटी होण्याची शक्यता
# तीनशे मि.मि. पाऊस एकाच दिवशी पडण्याचा अंदाज

**मुंबई, दि.६- नाशिक आणि त्र्यंबकेश्वर परिसरासाठी अत्यंत चिंतेची आणि मोठी बातमी समोर येत आहे. उद्या या भागात तीव्र ढगफुटी होण्याची दाट शक्यता असून, एकाच दिवसात तब्बल ३०० मिमी इतका विक्रमी पाऊस कोसळण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः याबाबतची माहिती देत नाशिक जिल्ह्याला सर्वात महत्त्वाचा इशारा दिला आहे. या पार्श्वभूमीवर नाशिकचे जिल्हा प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा पूर्णपणे ॲक्शन मोडवर आली आहे.**

नाशिकमधील संभाव्य नैसर्गिक आपत्तीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यम प्रतिनिधींशी बोलताना महत्त्वाची माहिती दिली. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, उद्या ७ जुलै २०२६ रोजी सर्वात महत्त्वाचा अलर्ट नाशिकला आहे. नाशिक आणि त्र्यंबकेश्वर दरम्यानच्या भागात उद्या ढगफुटी संभावित आहे. त्या प्रकारचे निर्देश आपल्याला प्राप्त झालेले आहेत. ही मोठी ढगफुटी असू शकते, जवळपास ३०० मिमी पाऊस ढगफुटीमुळे या भागात होऊ शकतो.

नाशिकच्या ब-याच मोठ्या भागात ढगफुटी होऊ शकते, त्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाने तयारी केलेली आहे. नाशिक शहर किंवा नाशिक जिल्हा या ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारे ढगफुटीमुळे जी परिस्थिती निर्माण होऊ शकते, त्याची पडताळणी करून बऱ्याचशा उपायोजना करण्यात आलेल्या आहेत. यावर आपल्याला अतिशय करडी नजर ठेवावी लागणार आहे, अशी माहिती त्यांनी दिली आहे.

दरम्यान, नाशिक जिल्हा परिषद आणि स्थानिक यंत्रणा सतर्क झाली आहे. नाशिकच्या घाटमाथा परिसरात पावसाचा रेड अलर्ट असल्याने काही तातडीचे निर्णय घेण्यात आले आहेत. नाशिकच्या ग्रामीण भागात मुसळधार पाऊस पडत असल्याने शाळांना सुटी देण्याचा निर्णय स्थानिक परिस्थिती पाहून घेण्याच्या सूचना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांनी दिल्या आहेत. ग्रामीण भागात कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तात्काळ मदत पोहोचवण्यासाठी (पान ४ वर)

## जमावबंदीचे उल्लंघन चार जणांवर गुन्हा

धुळे, दि.६- शहरात जमावबंदी आदेशाचे उल्लंघन करून विनापरवानगी निषेध आंदोलन केल्याप्रकरणी भारतीय संविधान सेनेच्या चार जणांविरुद्ध धुळे शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

येथील हिरे भवन परिसरात युवप्रवर्तक डॉ. हेडगेवार यांच्या जीवनपटावर आधारित नाटकाचे पाच जुलैस आयोजन करण्यात आले होते. या ठिकाणी उभारण्यात आलेल्या बॅरिकेटसजवळ भारतीय संविधान सेनेचे पदाधिकारी कार्यकर्ते यांनी रविवारी सायंकाळी सातच्या सुमारास विनापरवानगी निषेध आंदोलन (पान ४ वर)

# सोनगीर पाडा कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे आंदोलन चिघळले
# दोघांवर खंडणीचा गुन्हा दाखल; शिक्षकाला मारहाण

**नंदुरबार, दि.६ (प्रतिनिधी)- सोनगीरपाडा येथील एमकेडी कॉलेजमध्ये सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर कॉलेज प्रशासनाकडे १५ ते २० लाख रुपयांच्या खंडणी मागितल्याप्रकरणी दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तसेच रस्ता अडवून शिक्षकांना मारहाण केल्याने पाच आंदोलकांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ५ जुलै २०२६ रोजी दुपारी ३.०० ते ४.०० वाजण्याच्या सुमारास एमकेडी कॉलेज, सोनगीरपाडा फाटा कॅम्पसमध्ये ही घटना घडली. या प्रकरणी कॉलेजचे चालक धनंजय हरीभाऊ बडवर (वय ४५) यांनी फिर्याद दिली आहे.

फिर्यादीनुसार, आरोपी आदित्य अजबसिंग पाडवी व राहुल पावरा (पूर्ण नाव व पत्ता उपलब्ध नाही) यांनी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा देत कॉलेज सुरू ठेवायचे असेल आणि आंदोलन थांबवायचे असेल तर १५ ते २० लाख देण्याची मागणी केली. पैसे न दिल्यास कॉलेजची बदनामी करणे, जाळपोळ, तोडफोड, शिक्षकांना मारहाण करणे तसेच हॉस्टेलमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला धोका निर्माण होईल, अशी धमकी दिल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. या फिर्यादीवरून संबंधित आरोपींविरुद्ध खंडणी व धमकीसह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक सुरेश चोरे करीत आहेत. दरम्यान खामगाव चौफूलीजवळ रस्त्यावर शिक्षकांना अडवून हाताबुक्क्यांनी मारहाण करीत शिवीगाळ केल्याप्रकरणी शिक्षक विवेक वळवी यांनी पोलिसांत फिर्याद दिली असून या प्रकरणी आश्वीन कोकणी, रोहिदास बागूल, कृष्णा गावित व इतर दोघांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.आंदोलनात चर्चेत सहभागी न झाल्याने राग येत विद्यार्थ्यांनी दोघा शिक्षकांना शिवीगाळ केली. रस्ता अडवला.या प्रकरणाचा तपास पोहेकॉ काशिनाथ साळवे यांच्याकडे देण्यात आला आहे. एम के.डी. कॉलेज हे आमदार किशोर दराडे यांनी सुरु केली असून विद्यार्थ्यांकडून विना पावती पैसे उकळल्याचा आरोप करण्यात येत आहे.तसेच गेल्या चार दिवसापासून विद्यार्थी आंदोलन करीत असून (पान ४ वर)

# नंदुरबारला जाणाऱ्या बसला भरघाव
# ट्रेलर धडकला- एस.टी. चालक जखमी

**धुळे, दि.६ - राज्यात एकीकडे पावसाचा जोर वाढला असून मुंबई, पुण्यासह उपनगरात पावसाची धुव्वाधार बॅटिंग पाहायला मिळत आहे. त्यातच, शिंदखेडा तालुक्यातील चिमठाणे गावाजवळ धुळे-नंदुरबार मार्गावरील एसटी बस आणि मालवाहू ट्रेलर यांच्यात भीषण अपघात झाला.**

या अपघातात बस चालक अनिल देवरे यांच्या दोन्ही पायांना गंभीर दुखापत झाली असून बसमधील सुमारे ३० ते ४० प्रवाशांचे प्राण थोडक्यात बचावले. अपघातानंतर ट्रेलर चालक घटनास्थळावरून फरार झाला असून त्याचा शोध सुरू आहे.

प्राथमिक माहितीनुसार धुळे-नंदुरबार एसटी बस धुळ्याकडून नंदुरबारच्या दिशेने जात असताना चिमठाणे गावाकडून येणाऱ्या मालवाहू ट्रेलरने बसला समोरून जोरदार धडक दिली. ट्रेलरची धडक इतकी भीषण होती की बसच्या पुढील भागाचे मोठे नुकसान झाले आणि चालक गंभीर जखमी झाले आहेत. अपघात होताच परिसरातील नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत बचावकार्य (पान ४ वर)

## काळाराम मंदिरामधून काँग्रेसचे आंदोलन

मुंबई, दि.६- अयोध्येतील प्रभू रामाच्या मंदिराला रामभक्तांनी लाखो करोडो रुपये दान स्वरुपात दिले. सोने चांदीचे दागिने दिले पण भक्तांनी दिलेल्या दान व देणग्यांवर भाजपा व रा. स्व. संघाच्या लबाड बगलबच्चांनी दरोडा टाकला आहे.

हा केवळ पैसे अथवा देणग्यांवर टाकलेला दरोडा नसून श्रीरामाच्या नावावर कोट्यवधी भाविकांच्या श्रद्धेवरच टाकलेला दरोडा आहे. रामाला लुटणाऱ्या भाजपा व रा.स्व. संघाच्या दरोडेखोरांना कठोर शासन झाले पाहिजे, या मागणीसाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने एल्गार पुकारला असून (पान ४ वर)



# मनमानी फी घेतली व शिष्यवृती खाल्ली
# एम.के.डी.च्या विद्यार्थांचे तिव्र आंदोलन

**नंदुरबार, दि.६ (प्रतिनिधी)- नंदुरबार शहरातील नंदुरबार नवापूर रोडवर असलेल्या एम.के.डी. महाविद्यालयात नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे गेल्या तीन दिवसांपासून तीव्र आंदोलन सुरू आहे. महाविद्यालय प्रशासनाने विद्यार्थ्यांकडून अवाजवी फी वसूल केली आणि त्यांना मिळणारी शिष्यवृत्ती देखील महाविद्यालयाने स्वतःकडे वर्ग केली, असा गंभीर आरोप विद्यार्थ्यांनी केला आहे.**

आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे की, महाविद्यालय प्रशासनाच्या या मनमानी कारभारामुळे त्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन मागे न घेण्याचा निर्धार विद्यार्थ्यांनी व्यक्त केला आहे.

या प्रकरणाची दखल घेत आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख पंडित माळी यांच्या मार्गदर्शनाने व्यापारी आघाडीचे जिल्हाप्रमुख बापू महाजन यांनी आंदोलनस्थळी भेट दिली. त्यांनी विद्यार्थ्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि महाविद्यालय प्रशासनाचे प्रमुख आमदार किशोर दराडे यांच्याशी संपर्क साधून संपूर्ण प्रकरणाची माहिती घेत चर्चा केली.

विद्यार्थ्यांच्या सर्व समस्या आम्ही ऐकून घेतल्या आहेत. यासंदर्भात आमदार किशोर दराडे यांच्याशी सविस्तर चर्चा केली असून विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी योग्य तो मार्ग काढण्याचा प्रयत्न (पान ४ वर)

# मनपा पंधरा जुलै नंतर शास्ती आकारणार
# एकोणपन्नास को.कराची वसुली- अग्रवाल

**धुळे, दि.६- महानगरपालिकेच्या वतीने थकबाकीदारांना मालमत्ताकर भरणा केल्यास शास्ती माफीची घोषणा केली. त्यानुसार टप्प्या टप्प्याने शास्ती माफी देणे सुरू आहे. दि. १५ जुलै २०२६ नंतर दोन टक्के शास्ती आकारण्यात येणार आहे. आता पर्यंत एकोणपन्नास कोटी रूपयांची कर वसुली करण्यात आली असल्याची माहिती मालमत्ता विभागाचे अधिक्षक मुकुंद अग्रवाल यांनी दिली.**

मनपाची मालमत्ता करापोटी कोट्यवधींची थकबाकी अनेक मालमत्ताधारकांकडे बाकी आहे. महानगरपालिकेने शंभर कोटी रूपये कर वसुलीचे उद्दीष्ट्य समोर ठेवले असतांना त्यापैकी एकोणपन्नास कोटी रूपयांची थकबाकी व नियमित असलेली वसुली मालमत्ता विभागाने केली आहे.

मालमत्ताकर वसुलीसाठी महापालिकेच्या वतीने दि.१६ एप्रिल २०२६ ते १५ मे २०२६ या कालावधीसाठी दहा टक्के सुट, दि.१६ मे २०२६ ते दि.१५ जून २०२६ या कालावधीकरीता आठ टक्के, दि.१६ जून २०२६ ते दि.१५ जुलै २०२६ (पान ४ वर)

## शहाद्यात दोन घरे फोडली दागिने व रोकड लंपास

नंदुरबार, दि.६ (प्रतिनिधी)- शहादा शहरातील राहुलनगर परिसरात अज्ञात चोरट्यांनी बंद घराचे कुलूप तोडून सुमारे पाच लाख ४५४ हजार रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम लंपास केल्याची घटना घडली. याप्रकरणी शहादा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी कुटुंब बाहेरगावी असताना चोरट्यांनी घरात प्रवेश करून कपाटातील सोन्याचे मंगळसूत्र, चैन, अंगठ्या, लॉकेट, कानातील दागिने, चांदीचे दागिने तसेच रोख रक्कम असा मुद्देमाल चोरून नेला. पोलिसांनी घटनास्थळी पाहणी करून अज्ञात चोरट्यांविरुद्ध (पान ४ वर)

# शबरी घरकुल योजनेचे लक्ष्यांक
# तातडीने मंजूर करा - वंदना भामरे

**धुळे, दि.६ - शबरी (शहरी) घरकुल योजनेचा प्रलंबित लक्ष्यांक तातडीने मंजूर करून पात्र लाभार्थ्यांना पुढील हप्ता उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी धुळे महानगरपालिकेच्या नगरसेविका वंदना भामरे यांनी आदिवासी विकास मंत्री ना. अशोक उईके यांची मुंबई येथे भेट घेऊन केली.**

दि. ११ जानेवारी २०२४ व १९ ऑगस्ट २०२४ च्या शासन निर्णयानुसार शबरी (शहरी) आदिवासी घरकुल योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या होत्या. त्यानुसार धुळे



महानगरपालिका व आदिवासी विकास विभाग, धुळे यांच्या माध्यमातून ही योजना राबविण्यात आली. सन २०२४-२५ मध्ये ५२ लाभार्थ्यांना पहिल्या हप्त्याचा लाभ देण्यात आला असून अनेक पात्र लाभार्थी अद्यापही पुढील मंजुरीच्या प्रतीक्षेत आहेत. दरम्यान, पुढील (पान ४ वर)

### धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक

# ११ टक्के कर्जफेड, ऑनलाईन व्यवहारात सतर्क रहा
# सहकार सप्ताह निमित्त केले मार्गदर्शन व सत्कार

**नवापूर, दि.६ (प्रतिनिधी)- धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या नवापूर विभागीय कार्यालयात सहकार सप्ताहानिमित्त मार्गदर्शन व सत्कार कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांचा विभागीय अधिकारी पी. जे. वळवी, शाखाधिकारी मनोहर गावीत तसेच बँकेच्या कर्मचाऱ्यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.**




कार्यक्रमास बँकेचे संचालक अमरसिंग गावीत, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती तथा रंगावली संस्थेचे अध्यक्ष विनायक गावीत, पंचायत समितीचे माजी सभापती दिनकर ठिगळे, पांघराण संस्थेचे अध्यक्ष मोतीराम गावीत, बिलमांजरे संस्थेचे अध्यक्ष दिनकर गावीत, विभागीय अधिकारी पी. जे. वळवी, वसुली अधिकारी दिलीप वसावे, तपासणी अधिकारी एन. टी. गावीत, गट तपासणी अधिकारी विनोद गावीत, शाखाधिकारी मनोहर गावीत, बी बी करणकाळ,आर एस वळवी, यांच्यासह विविध सहकारी संस्थांचे सचिव, संचालक, कर्जदार सभासद, ठेवीदार आणि ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बँकेच्या अधिकारी एन टी गावीत,विनोद गावीत यांनी सभासद व ग्राहकांना विविध बँकिंग योजनांची (पान ४ वर)

## शिरपूरच्या सत्तर बीएलओंना नोटीस

शिरपूर दि.६ (का.प्र.): भारत निवडणूक आयोगाच्या आदेशाकडे दुर्लक्ष करणाऱ्या तालुक्यातील ७० बीएलओंना प्रशासनाने शो कॉज (कारणे दाखवा) नोटीस बजावली असून या कारवाईमुळे संबंधित यंत्रणेत एकच खळबळ उडाली आहे. एसआयआर २०२६ कडे बीएलओंचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप झाल्याने या प्रकरणाची चर्चा सुरु होती. त्यानंतर प्रशासनाने घेतलेल्या आढाव्यात कामाकडे बीएलओंचे दुर्लक्ष झाल्याचे निष्पन्न झाले.

निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार शिरपूर तालुक्यात मतदार यादीचे (पान ४ वर)

# व्यावसायिकांकडून घरगुती गॅसचा सर्रास वापर
# शहाद्यात पुरवठा विभागाच्या कारवाईत सिलेंडर जप्त

**शहादा, दि.०६(का.प्र.) - येथील नगरपालिका चौकात घरगुती गॅस सिलेंडरचा वापर सर्रासपणे व्यावसायिक कामासाठी करणाऱ्या हॉटेल व्यावसायिकांवर शहादा तहसील कार्यालयाच्या पुरवठा विभागाने सोमवारी सायंकाळी कारवाई केली आहे. या धडक मोहिमे दरम्यान पुरवठा विभागाने तीन अवैध घरगुती सिलेंडर जप्त केले असून या कारवाईमुळे शहरात नियमबाह्य सिलेंडर वापर करणाऱ्या व्यावसायिकांमध्ये एकच खळबळ उडाली आहे.**



गेल्या काही दिवसांपासून शहादा शहरात घरगुती गॅस सिलेंडरची मोठ्या प्रमाणावर टंचाई जाणवत आहे. या पार्श्वभूमीवर अनेक व्यावसायिक आपल्या हॉटेल्स, उपहारगृहे आणि चहाटपऱ्यांवर व्यावसायिक सिलेंडरऐवजी स्वस्त पडणारे घरगुती वापराचे सिलेंडर सर्रासपणे वापरत असल्याचे चित्र सर्वत्र पाहायला मिळत होते. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना आणि ग्राहकांना घरगुती सिलेंडर मिळण्यास अडचणी निर्माण होत होत्या.या गंभीर बाबीची दखल घेत काही दिवसांपूर्वीच जिल्हाधिकारी डॉ.मिताली सेठी यांच्या आदेशाने जिल्हा पुरवठा अधिकारी कैलास पवार यांच्या मार्गदर्शनाखाली शहादा शहरातील विविध हॉटेल आणि (पान ४ वर)

## भरधाव ट्रकची धडक मो.सायकलस्वार ठार

धुळे, दि.६- येथील सुरत वळण महामार्गावरील भरधाव ट्रकने मोटरसायकला मागून धडक दिल्याची घटना रविवारी (ता.५) सकाळी अकराच्या सुमारास घडली. अपघातात मोटर सायकलस्वार (एमएच१९/टी-९७२५) अशोक खंडू कुवर (रा. शिक्षक कॉलनी सुरत बायपास धुळे) यांचा गंभीर जखमी होऊन मृत्यू झाला. अशोक कुवर यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यांना रुग्णालयात दाखल केले असता उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. अपघातात मोटार सायकलचेही मोठे नुकसान झाले. या प्रकरणी (पान ४ वर)

## आत्महत्येस प्रवृत्त केले; गुन्हा दाखल

धुळे, दि.६- शहरातील गोळीबार टेकडी रोड परिसरातील पंधरा वर्षीय युवतीने गळफास घेऊन आत्महत्या केली. याप्रकरणी एका तरुणाविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा शहर पोलीस ठाण्यात दाखल झाला.

बादल माळी (रा. कालिकादेवी भिलाटी, धुळे) असे संशयिताचे नाव आहे. परिसरातील पंधरा वर्षीय युवती त्याने प्रेमाचे आमिष दाखवले, फसवणूक करीत तिचा शारीरिक, मानसिक छळ केला. दरम्यान, रविवारी दुपारी घरात युवतीने साडीने पंख्याला गळफास घेतल्याचे निदर्शनास आले. तिला सर्वोपचार रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. पीडीतेच्या (पान ४ वर)

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,34,200 रु.+3% GST
सोने- 24 K -1,46,500 रु.+3% GST
चांदी- 2,38,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

# आधुनिक कार्डीयाक केअर रूग्णवाहिका
# खरेदी करा- नगरसेवक मिर्झांचे पत्र

**धुळे, दि.६- शहरातील गरजु रूग्णांच्या हितासाठभ जिल्हा नियोजन मंडळाच्या मंजूर निधीतून दोन अत्याधुनिक कार्डीयाक केअर रूग्णवाहिका तात्काळ खरेदी करावयात. या मागणीचे निवेदन एमआयएमचे नगरसेवक मिर्झा शोएब नवाब बेग यांनी मनपा प्रशासनाला दिले आहे.**

हृदया संबंधी गंभीर आजाराने त्रस्त रूग्णाला तातडीने उपचार मिळणे आवश्यक आहे. शहरात अत्याधुनिक कार्डीयाक केअर सुविधानी सुसज्ज रूग्णवाहिकांचा अभाव असल्याने अनेक रूग्णांना वेळेत उपचार मिळणे



कठीण झाले आहे. काहींन आर्थिक परिस्थितीमुळे खाजगी रूग्णवाहिकांचा खर्च परवडणारा नाही. तत्कालिन पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी जिल्हा नियोजन मंडळाच्या जिल्हा नगरोत्थान योजनेंतर्गत दोन अत्याधुनिक कार्डीयाक केअर रूग्णवाहिकांसाठी निधी उलब्ध करून देण्याबाबत निर्देश दिले होते. त्यानुसार (पान ४ वर)

## साक्री प्रवासी संघला यश कासारे धाडणे बस थांबेल

साक्री, दि.६ (प्रतिनिधी)- साक्री तालुका महाराष्ट्र प्रदेश प्रवासी महासंघाने कासारे धाडणे येथे बस थांबवण्यात यावी. यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. त्याची दखल घेवून आगार प्रमुखांनी बस थांब्याला परवानगी दिल्याने आता कासारे फाट्याजवळ बसेस थांबणार असल्याने प्रवाशांमधून समाधान व्यक्त केले जाते आहे.

बस थांबण्या संदर्भात अध्यक्ष सुरेश.पारख, उपाध्यक्षा मंगला पारख, प्रा.डी.व्ही. सोनवणे नंदुरबार, जिल्हाध्यक्ष महादू हिरणवाळे यानी दि. १५ जून २०२६ रोजी नंदुरबार आगार प्रमुख संदिप निकम यांना कासारे फाट्यावर निवेदन दिले. तसेच २७ जून २०२६ (पान ४ वर)

**नंदुरबार, दि.६ (प्रतिनिधी)- शहरातील बाहेरपुरा परिसरातील महिलांनी स्मार्ट मीटर बसवल्यानंतर वीज बिलात मोठी वाढ झाल्याचा आरोप करीत वीज वितरण कंपनीच्या कार्यालयावर मोर्चा काढला. वाढीव वीज बिल कमी करावे तसेच स्मार्ट मीटर काढून पुन्हा जुने मीटर बसवावेत, अशी मागणी यावेळी करण्यात आली.**


महिलांच्या म्हणण्यानुसार, पूर्वी दरमहा पाचशे ते एक हजार रुपयांपर्यंत येणारे वीज बिल स्मार्ट मीटर बसवल्यानंतर तीन हजार ते आठ हजार रुपयांपर्यंत येत आहे. त्यामुळे सर्वसामान्य व हातमजुरी करणाऱ्या नागरिकांवर आर्थिक बोजा वाढल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी सुमारे ते महिला उपस्थित होत्या. त्यांनी वीज



# स्मार्ट मीटरमुळे विजेची बिले वाढली
# महिलांचा जुना मिटरसाठी भव्य मोर्चा

वितरण कंपनीचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. पाटील यांना निवेदन देऊन वाढीव बिलांची तपासणी करून तातडीने दिलासा द्यावा, अशी मागणी केली. निवेदनात स्मार्ट मीटर नागरिकांच्या पूर्वपरवानगीशिवाय बसविण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. मागणीची दखल न घेतल्यास जनआंदोलन व उपोषणाचा इशाराही महिलांनी दिला आहे.



# आ.पावरांच्या हस्ते डॉ.मुखर्जींना अभिवादन

शिरपूर, दि.६ (प्रतिनिधी)- **भारतीय जनसंघाचे संस्थापक, पहिले राष्ट्रीय अध्यक्ष, प्रखर राष्ट्रभक्त, शिक्षणतज्ज्ञ आणि अंत्योदयाच्या विचारांचे पुरस्कर्ते डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांची वी जयंती शिरपूर येथील आमदार कार्यालयात उत्साहपूर्ण व श्रद्धापूर्वक वातावरणात साजरी करण्यात आली.**

कार्यक्रमाच्या प्रारंभी शिरपूर तालुक्याचे आमदार काशिराम दादा पावरा यांनी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करत विनम्र अभिवादन केले. यावेळी त्यांनी डॉ. मुखर्जी यांच्या राष्ट्रनिष्ठा, अखंड भारताच्या संकल्पनेप्रती असलेली त्यांची बांधिलकी, शिक्षण क्षेत्रातील योगदान तसेच समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकासाची फळे पोहोचविणाऱ्या अंत्योदयाच्या विचारांचे स्मरण केले. त्यांच्या विचारांवर चालत सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी कार्य करण्याचा संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला.

यावेळी शिरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तथा भारतीय जनता पार्टी शिरपूर विधानसभा प्रमुख के. डी. पाटील यांनीही डॉ. मुखर्जी यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. त्यांनी डॉ. मुखर्जी यांच्या राष्ट्रभक्ती, त्याग आणि देशहितासाठी दिलेल्या योगदानाचे स्मरण करून त्यांच्या विचारांचे आजच्या पिढीने अनुकरण करण्याची गरज व्यक्त केली. कार्यक्रमास भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, विविध आघाड्यांचे कार्यकर्ते, मान्यवर तसेच आमदार कार्यालयातील कर्मचारी बंधू-भगिनी, लाभार्थी महिला भगिनी, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## NAME CHANGE

Here By I Declare That My Old Name
**HARALAL BADRIPRASAD JAT**
Has Been Changed To New Name
**HARLAL BADRIPRASAD JAT**
So Now Onwords All Official Work Must
Be Done. By My New Name,
**ADD- PLOT NO.21 VRUNDAVAN NAGAR NEAR MAHAVIR BHAVAN SHAHADA DISTRICT NANDURBAR**

## Walk-in-Ineterview

**Required**
**Principal**
**Qualifications: B.A./M.A./B.Sc./ M.Sc., B.Ed./M.Ed., D.S.M.**
**Walk-in-Interview**
**Date: 10th July, Time: 10:00 AM**
Please bring your resume along with you.
**Contact: 9421451818/9325322537**
**N.E.S.'s English Medium School**
Behind Sinchan Bhavan,
Sakri Road, Dhule

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, सर्व बँका, सर्ववित्तीय पतसंस्था, यांसी जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकत वर्णन तु. जि. धुळे पो. तु. ता. शिरपूर मौजे शिरपूर खु. येथील स.नं. २०/२/क पैकी प्लॉट नं. ५ चे एकूण क्षेत्र १५०.०० चौ. मी. यापैकी दक्षिणेकडील क्षेत्र ३७.५० चौ. मी. बांधीव घर यासी चतु:सिमा

पुर्वेस : ११ मी. रस्ता,
पश्चिमेस :प्लॉट नं. ११ व १२
दक्षिणेस : प्लॉट नं. ४,
उत्तरेस :प्लॉट नं. ५ पैकी भाग

या वरील मालकी हक्काची ताबे उपभोगातील मिळकतीचे मालक **श्री. नारायण धोंडू मराठे** रा. शिरपूर खु. ता. शिरपूर जि. धुळे यांनी लक्ष्मी इंडिया फायनांस लि. शाखा शिरपूर यांचेकडून तारण कर्ज घेत आहेत. सदर मिळकतीचे चैन दस्तातील **श्री. नारायण धोंडू मराठे, श्री. अभिमन धोंडू मराठे, श्री. डिगंबर धोंडू मराठे व हेमंत वासुदेव मराठे** यांनी वाटणीने घेतलेल्या दस्ताची आर. आर. पावती व मुळ वाटणीपत्र दस्त क्र. २८७९/२०१९ दि. ०६/०८/२०१९ हे गहाळ झालेले आहे.

मिळकत निर्बोज व निर्वेध असल्याचे सांगितले आहे. उपरोक्त प्लॉट बाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण, जप्ती, टांच, वारस, बक्षिस, बोजा, सौदा, इ. बाबत हरकत असल्यास प्रस्तुतची जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्त्यावर प्रत्यक्ष हरकतीसोबत योग्य तो कागदोपत्री पुरावा सादर करुन शहानिशा करुन द्यावी. टपाल व फोनवर तसेच वर्तमानपत्रात घेतलेली परस्पर हरकत मान्य होणार नाही. मुदतीत हरकत न आल्यास मिळकत निर्बोज आहे असे समजले जाईल. मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. ते आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. कळावे प्रस्तुतची जाहीर नोटीस अशिलांनी दिलेल्या माहिती, हजर केलेले दस्त व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे दि. ०६/०७/२०२६

**ॲड.लव विजय शर्मा**
घर नं. १९५८, किसनबत्ती चौक, ग. नं. ५ व ६ ची बोळ, माहेर साडी जवळ, धुळे
**मो. ९४२२७७०२७०**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था व सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन :** मौजे अकलाड ता. जि. धुळे येथील गट क्र. व उपविभाग ३०१ चे ला. ला. क्षेत्र ०१ हे. ४३ आर व पो. ख. ० हे. ०० आर असे एकूण क्षेत्र ०१ हे. ४३ आर चा आकार ४ रु. ५५ अश्या वर्णनाची जिरायत शेतजमीन मिळकत यास जुन्या वहिवाटीप्रमाणे कायमस्वरुपी वापर रस्ता आहे व राहील.

यासी चतु:सिमा.

**पुर्वेस : गट नं. ३००, २९३, २९२, पश्चिमेस : गट नं. २७६, दक्षिणेस : गट नं. २७७, उत्तरेस : गट नं. ३०२ व रस्ता**

येणे प्रमाणे वरील वर्णनाच्या आतील मिळकत ही श्री.मयुर अनिलराव ठाकरे रा. मोराणे ता. जि. धुळे यांच्या मालकीच्या व ताबे उपभोगातील असून यांच्याकडून सदर मिळकती या आमचे अशिल यांनी कायम स्वरुपी विकत घेण्याचा सौदा केलेला असून सदर मिळकत सौदा पोटी आमचे अशिलांकडून त्यांनी बयाणा रक्कम देखील स्विकारलेली आहे. आमचे अशिल सदरचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत. तरी सदर मिळकती संदर्भात कोणाचेही कुठल्याही प्रकारचे संबंध, हक्क, गहाण, तारण, टाच, बक्षिस, दावा, अर्जफाटे, हितसंबंध, तक्रार अथवा हरकत असेल तर त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर लेखी व कागदोपत्री पुरावा दाखवून प्रत्यक्ष भेटून शहानिशा करुन खात्री करुन द्यावी. अन्यथा उक्त मुदतीत कोणाचीही हरकत तक्रार न आल्यास सदरची मिळकत ही निर्बोज, निर्वेध व श्री. मयुर अनिलराव ठाकरे रा. मोराणे ता. जि.धुळे यांच्या मालकीच्या व ताबे उपभोगातील असल्याचे गृहीत धरुन खरेदीचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील. त्यानंतर आलेल्या हरकतींचा अथवा तक्रारींचा विचार केला जाणार नाही व परस्पर वर्तमानपत्रातून घेतलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत व ते आमच्या अशिलांवर सदर मिळकतीवरही बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस ही आमच्या अशिलांनी दिलेल्या माहिती, अधिकार व सांगण्यावरुन त्यांचेतर्फे आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. धुळे दि. ०६/०७/२०२६

**ॲड.ललित पांडुरंग देठे**
चव्हाण कॉम्प्लेक्स, सुरतवाल बिल्डींग जवळ, मिल परिसर, धुळे
**मो. ९४२२७७१२७४**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, सर्व हित संबंधीतांना तसेच सर्व वित्तीय संस्था व स्थानीक स्वराज्य संस्था यांना या जाहीर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परीशिष्ठात नमुद मिळकत कायमस्वरूपी विक्रीचा व्यवहार जमीन मालकाने आमचे अशील यांच्याशी केलेला असून लवकरच सदर खरेदीचा व्यवहार पूर्ण होणार आहे, सबब सदर मिळकतीच्या टायटल व्हेरीफिकेशन हेतू सदर जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे.

सदर मिळकतीवर कोणाचेही कोणतेही प्रकारचे मालकी हक्क, हिस्सा, हितसंबंध, कोणाचेही गहाण, बोजा, टांच, जप्ती, भाडेपट्टा वा लिज हक्क, ताबा हक्क वा सौदे करार हक्क अगर खरेदी हक्क वैगेरे काहीही असल्यास किंवा संकल्पीत व्यवहारास कोणत्याही प्रकारे हरकत वा विरोध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आंत त्याबददल स्वताच्या हक्काच्या प्रमाणीत झेरॉक्स प्रतिसह आम्हास खालील नमूद पत्त्यावर लेखी कळवावे, परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकतीचा तसेच दस्तऐवजांशिवाय घेतलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

नियोजीत मुदतीत कोणाचीही साधार व लेखी तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निर्बोज असून तथाकथीत हक्क व अधीकार संबंधीतांनी सोडून दिलेले आहे असे समजून सदर व्यवहार पूर्ण करण्यात येईल. या नंतर कोणीही काहीही तक्रार, हितसंबंध अगर हक्क दाखविल्यास ते आमचे आशिल आणि सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी, कळावे.

**परिशिष्ट**

मौजे निमगुळ ता.जि.धुळे येथील गट क्रंमाक ३७४/१ चे एकूण क्षेत्र १ हे.४३.५० आर (ला.ला.०० हे ९४ आर आणि पो.ख.०० हे ४९.५० आर) यासी आकार रू.२.१३ ची मिळकत आणि

गट क्रंमाक ३७४/२ चे एकूण क्षेत्र १ हे.८९.५० आर (ला.ला.१ हे ४० आर आणि पो.ख.०० हे ४९.५० आर) यासी आकार रू.३.१७ ची मिळकत, यासी दोन्ही मिळकतीची चतु:सिमा गावनकाशाप्रमाणे असे.

सदर जाहीर नोटीस अशिलाने दिलेल्या माहिती व अधिकारावरुन आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे. दिनांक- ०६/०७/२०२६.

**ॲड.राजेश नंदलाल अग्रवाल**
ऑफिस- ५, दिघे ॲडव्होकेट चेंबर्स, धुळे जिल्हा न्यायालया समोर, स्टेशन रोड, धुळे.
**मो.नं.९८५००९२७५३**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस बँक पतपेढी, पतसंस्था, वित्तीय संस्था, सावकार तसेच सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तु.जि.धुळे पो.तु.ता. धुळे पैकी मौजे धुळे येथिल स.नं.५०४/२ अ १ पैकी प्लॉट नं.१७ चे एकूण क्षेत्र ३२६.२० चौ.मी. चा बखळ प्लॉट, यासी चर्तुसिमा- पुर्वेस- प्लॉट नं.१६, पश्चिमेस- स.नं.५०४/१, उत्तरेस-प्लॉट नं.१, दक्षिणेस- २५ फुटी रस्ता, येणे प्रमाणे वर्णनाचा आतील बखळ प्लॉट १) धर्मेंद्र सुभाषचंद्र थाळनेरकर, २) सिंधुबाई साहेबसिंग चौधरी, ३) कविता धमेंद्र चौधरी, ४) हर्ष धर्मेंद्र चौधरी रा.१०४, शिवाजी हौसिंग सोसायटी, देवपुर, धुळे यांच्या मालकीचे व ताबेउपभोगातील आहे. सदर वरील प्रमाणे मिळकत ही आमचे अशिलांनी कायम खरेदीने विकत घेण्याचा सौदा केलेला असून बयाणा सुद्धा दिलेला आहे. लवकरच आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी तमाम लोकांना, सर्व बँक, पतपेढी, पतसंस्था, वित्तीय संस्था, सावकार यांना या जाहीर नोटीसाने कळविण्यात येते की, सदर बखळ प्लॉटवर कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क व व्यवहारा बाबत हरकत असल्यास, बखळ प्लॉट वर कोणाचाही बोजा, खावटी हक्क, इतर हक्क, हिस्सा, टांच, गहाण, जप्ती, वहिवाटी हक्क किंवा सदर बखळ प्लॉट संबधी कोणत्याही प्रकराचा न्यायालयात दावा न्याय प्रविष्ट किंवा प्रलंबित असल्यास तसेच कोणाचाही लाभात बक्षिसपत्र, सौदापावती, विक्री पावती, खरेदीखत करुन दिलेले असल्यास, असे कोणत्याही प्रकारचे हक्क किंवा हितसंबंध असल्यास त्यांनी लेखी हरकत किंवा तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील पत्यावर कागदोपत्री पुरावासह प्रत्यक्ष कळवावी. टपाल, फोनवर व वर्तमान पत्रात परस्पर हरकत मान्य होणार नाही.

मुदतीत हरकती अगर तक्रारी न आल्यास सदर बखळ प्लॉट निर्वेध व निर्बोज समजून आमचे अशिल सदरहु बखळ प्लॉटचे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस ही आमच्या आशिलांच्या सूचनेवरून आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. दिनांक- ०६/०७/२०२६.

**ॲड.अनिल सुरेश अग्रवाल**
ग.नं.४, भांडी बाजार, कांती कॉम्प्लेक्स शेजारी, धुळे.
**मो.नं.७७०९७७२७५७, ७५८८८८४१०७**

## जाहीर नोटीस

नि. ७

**शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो. ज्युनि. डिव्ही. यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज नं. ५३७/२०२६
नि. नं. ७ चौ. ता.३१/७/२०२६

**१) जनाबाई रमेश कोळी, २) प्रकाश रमेश कोळी,**
**३) सिताबाई रामा कोळी, ४) आक्काबाई मधुकर कोळी**
सर्व रा. सांगवी ता.शिरपूर जि. धुळे .. अर्जदार

विरुद्ध

**कोणीही नाही** ... जाबदेणार
**रमेश देवचंद कोळी,** मयताचा पत्ता : सांगवी ता.शिरपूर जि. धुळे
मृत्यू दि. ०५/०१/२०२३ ... मयत

ज्याअर्थी अर्जदार नं. १ यांचे पती व अर्जदार नं. २ ते ४ यांच वडील नामे रमेश देवचंद कोळी हे. दि. ०५/०१/२०२३ रोजी मौजे सांगवी ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झालेले आहेत. मयतास अर्जदार नं.१ ते ४ हेच कायदेशीर वारस आहेत. म्हणून अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अधिनियमाच्या कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज मे. न्यायालयात त्यांनी दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या नोटीशीने तमाम जनतेला कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदारांव्यतिरिक्त जे कोणी कायदेशीर वारस असतील त्यांनी मे. न्यायालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत अगर दि. ३१/०७/२०२६ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. अन्यथा सदरील अर्जदाराच्या तोंडी लेखी पुरावा घेवून त्या आधारे अर्जदारा व्यतिरिक्त दुसरे कोणीच वारस नाही. असे गृहीत धरण्यात येवून मयतास वारस म्हणून वारसाचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी केलेल्या मागणीप्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर शिरपूर जि. धुळे यांचे आदेशावरुन प्रसिद्धीस दिली असे.

सही.... सही...
**कनिष्ठ लिपीक** (कोर्टाचा शिक्का) **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर दिवाणी न्यायालय, शिरपूर

## जाहीर नोटीस

नि. ६

**शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो. ज्युनि. डिव्हीजन यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज नं. ३३०/२०२६

**१) नयनकोरबाई दिलीपसिंग राजपूत वगैरे ३** .. अर्जदार

विरुद्ध

**कोणीही नाही** ... जाबदेणार
**दिलीप अजबसिंग गिरासे ,**
रा. अहिल्यापूर ता.शिरपूर जि. धुळे ... मयत

ज्याअर्थी अर्जदार नं. १ चे पती व अर्जदार नं. २ व ३ चे वडील नामे दिलीप अजबसिंग गिरासे हे दिनांक ११/०३/२०२६ रोजी मौजे मांडळ ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झाले. त्याअर्थी अर्जदारांना मयताचे वारस लावण्यासाठी तसेच वारसांना शासकीय, निमशासकीय कामासाठी मयताचा वारस दाखला लागणार असल्याने वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदारांनी सदरील अर्ज दाखल केला आहे.

तरी ज्या कोणाची हरकत, तक्रारी असेल त्यांनी आपली हरकत, तक्रार स्वत अगर वकीलामार्फत हजर होवून दि. २७/७/२०२६ पावेतो सकाळी १०.३० वाजता कोर्टात मांडावी. तसे न केल्यास कोणाचीही काहीही हरकत नाही.असे समजले जाईल व वरील वारसांच्या नावाने वारस दाखला देण्यात येईल. आज रोजी आमचे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली असे.

दि. ३०/६/२०२६ आदेशावरुन

सही.... सही...
**कनिष्ठ लिपीक** (कोर्टाचा शिक्का) **सहा. अधिक्षक**
शिरपूर कोर्ट शिरपूर कोर्ट

## जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो. ज्युनि. डिव्ही. यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज नं. ५५४/२०२६
नि. नं. ६ चौ. ता.२८/७/२०२६

**१) जगन सुपा पावरा,** रा. उर्मदा ता.शिरपूर जि. धुळे
**२) चंद्रसिंग सुपा पावरा,**
रा. ३८, दोंदवाडा पो. उर्मदा ता.शिरपूर जि. धुळे .. अर्जदार

विरुद्ध

**कोणीही नाही** ... जाबदेणार
**सुपा हिरा पावरा,** मयताचा पत्ता : रा. ३८, दोंदवाडा पो. उर्मदा ता.शिरपूर जि. धुळे
मृत्यू दि. १२/०१/२०१३ ... मयत

ज्याअर्थी अर्जदार नं. १ व २ यांचे वडील नामे सुपा हिरा पावरा हे दि. १२/०१/२०१३ रोजी मौजे दोंदवाडा पो. उर्मदा ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झालेले आहेत. मयतास अर्जदार नं.१ ते २ हेच कायदेशीर वारस आहेत. म्हणून अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अधिनियमाच्या कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज मे. न्यायालयात त्यांनी दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या नोटीशीने तमाम जनतेला कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदारांव्यतिरिक्त जे कोणी कायदेशीर वारस असतील त्यांनी मे. न्यायालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत अगर दि. २८/०७/२०२६ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. अन्यथा सदरील अर्जदाराच्या तोंडी लेखी पुरावा घेवून त्या आधारे अर्जदारा व्यतिरिक्त दुसरे कोणीच वारस नाही. असे गृहीत धरण्यात येवून मयतास वारस म्हणून वारसाचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी केलेल्या मागणीप्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर शिरपूर जि. धुळे यांचे आदेशावरुन प्रसिद्धीस दिली असे.

सही.... सही...
**कनिष्ठ लिपीक** (कोर्टाचा शिक्का) **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर दिवाणी न्यायालय, शिरपूर

## जाहीर नोटीस

नि. ६

**शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो. ज्युनि. डिव्ही. यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज नं. ५५८/२०२६

**१) गोखर्या रेहजा उर्फ रेहंजा पावरा, २)केसराम रेहेजा उर्फ रेहंजा पावरा**
**३) भरत रेहजा उर्फ रेहंजा पावरा,**
सर्व रा.जोयदा ता. शिरपूर जि. धुळे .. अर्जदार

विरुद्ध

**कोणीही नाही** ... जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार गोखर्या रेहजा उर्फ रेहंजा पावरा वगैरे यांनी मे. न्यायालयात नामे रेहंजा उर्फ रेहजा मन्नू पावरा हे दि. १२/०१/२०२३ रोजी मौजे जोयदा ता.शिरपूर जि. धुळे येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर एकमेव वारस असल्याबाबत अर्जदार याने बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणे करीता, अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी तमाम लोकांना कळविण्यात येते की,नामे रहेंजाउर्फ रेहजा मन्नू पावरा यांचे वारसांबाबत वर नमूद अर्जास कोणाची काही हरकत/तक्रार असल्यास दि. २८/७/२०२६ रोजी ठिक १०.३० वाजता मे. न्यायालयात हजर होवून लेखी तक्रार सादर करावे तसे न केल्यास अर्जदार यांचा अर्ज मंजूर करुन अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दि. ३०/६/२०२६ आदेशावरुन

सही.... सही...
**कनिष्ठ लिपीक** (कोर्टाचा शिक्का) **सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय,शिरपूर दिवाणी न्यायालय, शिरपूर

## जाहीर नोटीस

नि. नं. ६

**शिरपूर येथील मे.दिवाणी न्यायाधिश सो. कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज नं. ५८८/२०२६

**१) दिलीप तुळशिराम येशी (धोबी) २) कै.श्याम तुळशिराम येशी (धोबी) (मयत)**
**२अ) कल्पनाबाई श्याम येशी(धोबी) २ब) रोशनी श्याम येशी (धोबी)**
**२क) पायल श्याम येशी (धोबी), २ड) नंदीनी श्याम येशी (धोबी) (पुणे)**
सर्व रा.भवानी टेक, ता.शिरपूर जि. धुळे .. अर्जदार

विरुद्ध

**कोणीही नाही** ... जाबदेणार
**१) कै. तुळशिराम जागो येशी(धोबी) मृत्यू दि. १३/१/२०१३**
**२) कै. सुमनबाई तुळशिराम येशी(धोबी) मृत्यू दि. ०२/०९/२०२३**
**३) कै. श्याम तुळशिराम येशी(धोबी) मृत्यू दि. ०२/०६/२०२४**
**नं. १ व २ रा. शिरपूर** ता.शिरपूर जि. धुळे ... मयत

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

अर्जदार याने म. दिवाणी न्यायाधिश सो. कनिष्ठ स्तर शिरपूर यांचे कोर्टात दिवाणी कि. अर्ज नं. ५८८/२०२६ चा बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८७२ कलम २ प्रमाणे वारस दाखलासाठी अर्ज केला आहे. अर्जदार नं. १ चे वडील कै. तुळशिराम जागो येशी (धोबी) मृत्यू दि. १३/१/२०१३, कै. सुमनबाई तुळशिराम येशी (धोबी) तसेच दि. २/९/२०२३, कै. श्याम तुळशिराम येशी (धोबी) मृत्यू दि. २/६/२०२४ मुळ गाव शिरपूर व अर्थे ता. शिरपूर जि. धुळे येथे वृद्धापकाळाने मयत झाले आहेत. अर्जदार यांनी त्याचा वारस दाखला हा तसेच शासकीय व निमशासकीय योजनांचा लाभासाठी गरजेचा होता. अर्जदाराचे नावे लावणे कामी वारस दाखल्यासाठी अर्जदार यांनी सदरचा अर्ज केला आहे.

याकामी कोणाचेही कोणतीही कायदेशीर तक्रार असल्यास मे. न्यायालयात दि. ३१/७/२०२६ रोजी सकाळी ठिक१०.३० वा. स्वत: किंवा वकिलामार्फत हजर राहून हरकत नोंदवावी. तसे न केल्यास मे.न्यायालयास योग्य तो पुढील आदेश करावा लागेल.याची नोंद घ्यावी. स्थळ : शिरपूर दिनांक २५/६/२०२६

सही.... सही...
**कनिष्ठ लिपीक** (कोर्टाचा शिक्का) **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्याया. क.स्तर, शिरपूर दिवाणी न्याया. क.स्तर, शिरपूर

## जाहीर नोटीस

नि. ७

**वकील-विशाल बी. मराठे**
ऑफिस : विरदेल रोड, शिंदखेडा

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो.(ज्युनियर डिव्हीजन)यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज नं. ६०६/२०२६

**१)शितल भ्र. महारु पाटील, २) चैताली महारु पाटील**
**द्वारा - अ. पा. क. आई अर्जदार नं. १**
दोघे रा. सुकवद ता.शिंदखेडा जि. धुळे .. अर्जदार

विरुद्ध

**मयत महारु भगवान पाटील**
**मृत्यचे ठिकाण रा. रुदावली** ता.शिरपूर जि. धुळे ... जाबदेणार

ज्याअर्थी महारु भगवान पाटील हे अर्जदार नं. १ चे पती व अर्जदार नं. २ चे वडील होते. ते दि. २५/०८/२०१९ रोजी रुदावली ता.शिरपूर जि. धुळे येथे मयत झाले आहेत. मयत महारु भगवान पाटील ह्यांना अर्जदार नं. १ ही विधवा पत्नी व अर्जदार नं. २ ही मुलगी ह्या नात्याने कायदेशीर वारस आहेत. असे हेअरशिप सर्टीफिकेट वारस दाखला मिळावा. ह्याकरीता अर्जदार ह्यांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदरचे अर्जाचे कामी जर कोणाला काही म्हणणे मांडावयाचे असेल तर ते म्हणणे मांडण्यासाठी त्यांनी दि. ४/८/२०२६ रोजी सकाळी १०.३० वा. ह्या मे.न्यायालयात जातीने किंवा ज्यास यथा योग्यरित्या सुचना दिलेल्या आहेत व जे वादा संबंधीच्या महत्वाच्या सर्व प्रश्नांची उत्तरे देऊशकतील अशा वकीलांमार्फत ह्या न्यायालयात उपस्थित रहावे.

जर वर नमूद केलेल्या दिवशी कोणाचे काही म्हणणे न आल्यास सदर अर्जातील वादाची सुनावणी केली जावून निर्णय केला जाईल.

आज दि. ६/७/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायायलाच्या शिक्क्यानिशी दिले. . आदेशावरुन

सही.... सही...
**कामगिरी क्लर्क** (कोर्टाचा शिक्का) **सहाय्यक.. अधिक्षक**
. दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, शिरपूर

# धुळे महानगरपालिका

महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, गुरु शिष्य स्मारक, साक्री रोड, धुळे-४२४००१.
दूरध्वनी क्र.०२५६२-२८८३१०/२८८३०१ **Email id: dhule_dme@rediffmail.com**

## जाहिरात

धुळे महानगरपालिका अंतर्गत धुळे महानगरपालिका शिक्षण विभागांतर्गत **Dhule MNP Happy Hearts Pre School**, आर.आर. पाटील कॉम्पलेक्स, धुळे येथे (नर्सरी ते सिनिअर के.जी.) या इंग्रजी पूर्व प्राथमिक शाळेत शिक्षक व मदतनीस या पदांवर पूर्णतः कंत्राटी पद्धतीने नियुक्ती करण्यासाठी दिनांक ०६/०७/२०२६ ते दिनांक १३/०७/२०२६ या कालावधीत पात्र उमेदवारांकडून ऑनलाइन अर्ज मागविण्यात येत आहेत.

सदर नियुक्ती प्रथम ०६ महिन्यांच्या कालावधीसाठी राहील. इच्छुक व पात्र उमेदवारांनी धुळे महानगरपालिकेच्या ऑनलाइन भरती पोर्टलवर विहित मुदतीत अर्ज सादर करावा.

| अ.क्र. | पदनाम | प्रवर्ग | एकूण पदसंख्या | एकत्रित मासिक मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | शिक्षक | खुला | २ | रु.१३,०००/- |
| १ | मदतनीस | खुला | ३ | रु.७,५००/- |

पदाची कर्तव्ये/जबाबदाऱ्या/आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता/अनुभव ई. बाबत सविस्तर जाहिरात **https://jobrecruitment.dhulecorporation.in/** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**नितीन कापडणीस**
**आयुक्त**
**धुळे महानगरपालिका**

महाराष्ट्र शासन

# उपविभागीय अधिकारी, शिरपूर भाग, शिरपूर यांचे कार्यालय

**Email Id : sdoshirpur@gmail.com** **Phone : 02563-295397**

क्र. कक्ष-१/गावठाण/शेत पाणंद रस्ते/कावि/४३८/२०२६ शिरपूर, दि. ०६/०७/२०२६

## जाहीर सूचना

संदर्भ :- १. महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. लवेसू-२०२५/प्र.क्र.०२/पाणंद रस्ते/दिनांक १४/१२/२०२५.
२. महसूल व वन विभाग महाराष्ट्र शासन यांचे शुध्दीपत्रक क्रमांक. लवेसू-२०२५/प्र.क्र.०२/(E1452710)/पाणंद रस्ते दिनांक १८/०२/२०२६.
३. महसूल व वन विभाग महाराष्ट्र शासन, यांचे पत्र क्रमांक: लवेसू- २०२५/प्र.क्र.०२/(६१४५५२७१०)/पाणंद रस्ते दिनांक १८/०२/२०२६.

महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक: लवेसु २०२५/प्र.क्र.२/पाणंद रस्ते दिनांक १४/१२/२०२५ अन्वये धुळे जिल्हाकरीता विधानसभा क्षेत्रातील मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना २०२६ २०२७ करीता दर निश्चित करण्यासाठी विधानसभा क्षेत्र निहाय (यंत्रसामुग्री इंधन मनुष्यबळ) प्रति तासिका दर ई-निविदाव्दारे खाजगी यंत्रसामुग्री धारकाकडून दर मागविण्यात आले होते.

त्याअनुषंगाने निविदामध्ये प्राप्त न्युनत्तम दराला जिल्हास्तरीय समितीव्दारे प्राप्त मंजुरीबाबत जोडलेल्या परिशिष्ट-५ मध्ये नमुद केलेले आहे.

महसूल व वन विभाग महाराष्ट्र शासन यांचे शुध्दीपत्रक क्रमांक: लवेसु २०२५/प्र.क्र.०२/(**E 1452710**) पाणंद रस्ते दिनांक २५ मार्च २०२६ अन्वये जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेली तांत्रीक अर्हता (**Technical Qualifiation**) व अंतिम केलेला प्रति तास दर (**L1 Rate**) (परिशिष्ट ५ प्रमाणे) आधारभुत मानुन शिंदखेडा विधानसभा क्षेत्रामध्ये काम करण्यास इच्छुक असेल त्या कंत्राटदाराने योग्य व आवश्यक दस्ताऐवजासह निविदा फी रुपये १०,०००/- धनाकर्ष (**Demand Draft**) व रुपये १५.०० लक्षाचा **FDR** उपविभागीय अधिकारी, शिरपूर भाग, शिरपूर यांच्या नावे जमा करुन नामनिर्देशन (**Empanelment**) करीता मोहरबंद लिफाफ्यात आवेदन पत्र दिनांक ०७/०७/२०२६ ते दिनांक २१/०७/२०२६ या कालावधीमध्ये मागविण्यात येत आहे.

सदर जाहिरात, हमीपत्र, प्रमाणपत्र तसेच अटी व शर्तीचा सविस्तर तपशिल **www.dhule.gov.in** या संकेतस्थळावर व तहसील कार्यालय शिंदखेडा/अपर तहसिल कार्यालय, दोंडाईचा, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिंदखेडा, उप अधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, शिंदखेडा, तालुका कृषी अधिकारी, शिंदखेडा, वनपरिक्षेत्र अधिकारी, शिंदखेडा व कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

**(डॉ.शरद मंडलिक)**
**उपविभागीय अधिकारी**
**शिरपूर भाग, शिरपूर**

जाहिरात क्र/जिमाका/धुळे/जाहि/६४/२०२६-२७

## पान १ वरुन

### महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा कहर; पुन्हा रेड अलर्ट

रायगड जिल्ह्यांसाठी अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. काही भागांत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता असून जोरदार वारे वाहण्याचाही अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. वाऱ्याचा वेग ताशी ८० ते ९० किलोमीटरपर्यंत पोहोचण्याची शक्यता असल्याने नागरिकांना विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मुसळधार पावसामुळे मुंबई महानगर क्षेत्रातील अनेक सखल भागांमध्ये पाणी साचल्याचे चित्र आहे. त्यामुळे रस्ते वाहतुकीचा वेग मंदावला असून काही ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे.

**रेल्वे आणि रस्ते वाहतुकीला पावसाचा फटका**

सततच्या पावसाचा परिणाम रेल्वे आणि रस्ते वाहतुकीवरही झाला आहे. रेल्वे मार्गांवर काही ठिकाणी पाणी साचल्याने मुंबईतील लोकल सेवा सुमारे १५ ते २० मिनिटे उशिराने धावत आहेत. त्यामुळे सकाळपासूनच प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. दरम्यान, कर्जत-खोपोली मार्गावरील रेल्वे सेवा तांत्रिक कारणामुळे तात्पुरती प्रभावित झाली आहे. प्रशासनाकडून सेवा पूर्ववत करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरही पावसाचा परिणाम झाला. घाट परिसरात दरड कोसळल्यामुळे काही काळ वाहतूक प्रभावित झाली होती. प्रशासन आणि संबंधित यंत्रणांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून मार्गावरील अडथळे दूर करण्याचे काम हाती घेतले.

**उल्हास नदीने ओलांडली धोक्याची पातळी**

ठाणे जिल्ह्यातील बदलापूर परिसरात परिस्थिती चिंताजनक बनली आहे. उल्हास नदीच्या पाणीपातळीत वेगाने वाढ झाली असून नदीने धोक्याची पातळी ओलांडल्याचे सांगण्यात येत आहे. नदीकाठच्या आणि सखल भागांमध्ये पाणी शिरण्यास सुरुवात झाल्याने स्थानिक प्रशासन सतर्क झाले आहे.गरज भासल्यास नागरिकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. राज्यातील विविध धरणांच्या पाणलोट क्षेत्रातही जोरदार पाऊस सुरू असल्याने धरणांमधील पाणीसाठ्यात वाढ होत आहे. जलसंपदा विभाग आणि जिल्हा प्रशासन परिस्थितीवर सतत लक्ष ठेवून आहे.

**नागरिकांनी अनावश्यक प्रवास टाळावा**

आपत्ती व्यवस्थापन विभागाने नागरिकांना अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर न पडण्याचे आवाहन केले आहे. मुसळधार पाऊस आणि जोरदार वाऱ्याच्या पार्श्वभूमीवर समुद्रकिनारे, नदीकाठ, धबधबे आणि इतर धोकादायक पर्यटनस्थळांवर जाणे टाळावे, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.तसेच मोठ्या झाडांखाली, जीर्ण इमारतींजवळ आणि मोठ्या होर्डिंग्जच्या परिसरात थांबू नये. पाणी साचलेल्या रस्त्यांवरून वाहन चालवताना विशेष खबरदारी घ्यावी. विजेच्या खांबांपासून आणि उघड्या विद्युत तारांपासून सुरक्षित अंतर ठेवण्याचेही आवाहन करण्यात आले आहे.

कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी ११२, १०७० किंवा १०७७ या हेल्पलाइन क्रमांकांवर संपर्क साधावा. नागरिकांनी सोशल मीडियावरील अप्रमाणित माहिती आणि अफवांवर विश्वास न ठेवता केवळ अधिकृत सरकारी सूचना, हवामान विभागाचे अंदाज आणि स्थानिक प्रशासनाच्या घोषणांकडे लक्ष द्यावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता असल्याने मुंबई महानगर क्षेत्रासह कोकणातील प्रशासनाला सतर्क राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. नागरिकांनी प्रवासाचे नियोजन करण्यापूर्वी रेल्वे, रस्ते वाहतूक आणि हवामानासंबंधी ताज्या अधिकृत सूचना तपासाव्यात, असेही प्रशासनाने म्हटले आहे.

### त्र्यंबकेश्वर ते नाशिक दरम्यान ढगफुटी होण्याची शक्यता

अंगणवाडी सेविका आणि आशा सेविका यांना २४ तास अलर्ट राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. ग्रामीण भागात किंवा नदीकाठच्या गावांमध्ये पूरपरिस्थिती अथवा दरड कोसळण्यासारखी कोणतीही दुर्घटना घडल्यास, त्याची माहिती तात्काळ जिल्हा प्रशासनाला देण्याचे आवाहन जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांनी केले आहे.

**अनेक जिल्ह्यांना रेड अलर्ट**

कोकण आणि मुंबई: प्रादेशिक हवामान केंद्राने आज मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांसाठी रेड अलर्ट जारी केला असून अत्यंत मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे.

**पुणे जिल्ह्यात शाळांना सुटी**

पुणे जिल्ह्यासाठीही हवामान विभागाने रेड अलर्ट दिला आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा विचार करता जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी जिल्ह्यातील सर्व शाळांना सुट्टी जाहीर केली आहे, तर पुणे शहरातील शाळांना महापौर मंजूषा नागपुरे यांनी सुट्टी दिली आहे.

### चंपतराव व मिश्रांचा अखेर राजीनामा मंजूर

संकुलातील विश्रामगृहात सुरू झाली. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष नृत्यगोपाल दास यांच्यासह नऊ स्थायी सदस्यांपैकी सात सदस्य उपस्थित होते, असं वृत्त पीटीआयने दिलं आहे.

**नियमानुसार राजीनामा मंजूर केला**

ट्रस्टच्या या बैठकीबद्दल राममंदिर ट्रस्टचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंद देव गिरीजी महाराज यांनी प्रसारमाध्यमांना सांगितलं, या प्रकारामुळे आम्ही सर्वजण दुःखी आणि व्यथित झालो आहोत. चोरी लहान आहे की मोठी, हा दुय्यम मुद्दा आहे; येथं असं वातावरण निर्माण होऊ दिलं गेलं, या मुख्य गोष्टीचं आम्हांला दुःख आहे. परंतु, सत्य आपल्यासमोर आहे आणि त्यावर चिंतन करणं आमचं कर्तव्य आहे. सध्याची परिस्थिती पाहता, एक गंभीर परिस्थिती निर्माण झाली, सरचिटणीस चंपत राय आणि विश्वस्त अनिल मिश्रा यांनी राजीनामे सादर केले. सरचिटणीस म्हणून कार्यरत असलेले चंपत राय कमालीचे दुःखी होते; जोपर्यंत पूर्ण न्याय मिळत नाही म्हणजेच गुन्हेगार पकडले जात नाहीत आणि त्यांना योग्य शिक्षा होत नाही, तोपर्यंत आपल्या पदावर राहणं त्यांना अयोग्य वाटलं. याच भावनेने प्रेरित होऊन त्यांनी आपला राजीनामा दिला. जी गोष्ट स्वीकारणे किंवा नाकारणे केवळ आमच्या हातात नव्हते. के. परासरन यांनी एक महत्त्वाचा मुद्दा मांडला, ट्रस्टच्या घटनेनुसार, राजीनामा सादर केल्या क्षणापासूनच तो मंजूर मानला जातो.

**वेळे आधी बैठक**

गोविंद गिरी यांनी सांगितलं की, ट्रस्टने मूळ नियोजनानुसार ११ जुलै रोजी बैठक घेण्याचं ठरवलं होतं. परंतु, देणगी चोरी प्रकरणातील घडामोडी लक्षात घेऊन ही बैठक ठरलेल्या वेळेपूर्वी घेण्याचा निर्णय घेण्यात आला. ट्रस्टची नियोजित बैठक (जी मूळची ११ जुलै रोजी होणार होती) शक्य तितक्या लवकर घेण्याचा निर्णय घेण्यात आला; परिणामी, सर्वांशी माहिती सामायिक करून, आम्ही आज ६ जुलै रोजी ही बैठक बोलावली, असे ते म्हणाले.

### मनमानी फी घेतली व शिष्यवृती खाल्ली

केला जाईल.या प्रकरणात विद्यार्थ्यांचे कोणतेही नुकसान होऊ देणार नाही. विद्यार्थ्यांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी आम्ही प्रशासनाशी चर्चा करण्याचे त्यांनी सांगितले.यावेळी विशाल माळी, बापू माळी यांच्यासह अनेक शिवसैनिक उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या आंदोलनामुळे महाविद्यालयातील शैक्षणिक वातावरणावर परिणाम झाला असून, लवकरात लवकर प्रश्न सुटावा अशी मागणी पालकांकडूनही होत आहे.

### जमावबंदीचे उल्लंघन चार जणांवर गुन्हा

केले. संविधान जिंदाबाद, आर.एस.एस. मुर्दाबाद अशी घोषणाबाजी केली. याप्रकरणी हवालदार एम. यु. महाले यांनी दिलेल्या तक्रारीनुसार गोपाल मंगल शिरसाठ, रा.नंदाणे), रविंद्र मधुकर पवार (रा. कृषीनगर,धुळे), संतोष पंढरीनाथ अमृतसागर (रा.आनंदखेडा,ता. धुळे), आनंद लोंढे (रा.अजिंठा कॉलनी, साक्री रोड, धुळे) यांच्याविरुद्ध धुळे शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. हवालदार ए. एस. बागुल तपास करीत आहेत.

## पान १ वरुन

### शबरी घरकुल योजनेचे लक्ष्यांक

लक्ष्यांक अद्याप मंजूर न झाल्याने लाभार्थ्यांना दुसरा हप्ता मिळू शकलेला नाही. पावसाळा सुरू झाल्यामुळे पहिला हप्ता मिळालेल्या अनेक लाभार्थ्यांनी घराचा पाया बांधून ठेवला असून त्यांचा संसार उघड्यावर आला आहे. त्यामुळे त्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर धुळे महानगरपालिकेतील भारतीय जनता पार्टीच्या नगरसेविका वंदना भामरे यांनी आदिवासी विकास मंत्री ना. अशोक उईके यांची भेट घेऊन लाभार्थ्यांची कैफियत मांडली. तसेच प्रलंबित लक्ष्यांक तातडीने मंजूर करून आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची विनंती केली.

यावेळी मंत्री उईके यांनी शबरी (शहरी) घरकुल योजनेसाठी आवश्यक निधी व लक्ष्यांक लवकरात लवकर मंजूर करण्यासाठी सकारात्मक कार्यवाही करण्यात येईल, अशी ग्वाही नगरसेविका वंदना भामरे यांना दिली.

### शहाद्यात दोन घरे फोडली दागिने व रोकड लंपास

गुन्हा नोंद केला असून पुढील तपास सुरू आहे. यश किशोर वर्मा याच्या तापी रेसीडेंन्सीमधून तर वैभव ब्रिजलाल पाटील यांच्या घरातून ही चोरी करण्यात आली. या प्रकरणाचा तपास पोलिस निरीक्षक हेमंत पाटील यांच्याकडे देण्यात आला आहे.साधारण सहा तोळे सोने तसेच चांदीचे दागिने व रोकड असा हा मुदेमाल आहे. पाच जूलै रोजी रात्री दोन ते तीन तीस च्या सुमारास ही चोरीची घटना घडली.

### सोनगीर पाडा कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे आंदोलन चिघळले

आदिवासी विद्यार्थ्यांची लुट थांबवावी,२०२३ मध्ये घेतलेले पैसे परत करावे,यासाठी आंदोलन सुरु आहे. एवढे दिवस का मागणी केली नाही,असा सवाल आ दराडे यांनी केला आहे. त्यामुळे एमकेडी कॉलेजचा वाद चांगलाच चिघळला आहे.

### ९९ टक्के कर्जफेड, ऑनलाईन व्यवहारात सतर्क रहा

सविस्तर माहिती दिली. मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की, चालू आर्थिक वर्षात ग्राहकांनी कर्जफेडीत तब्बल ९९ टक्के यश मिळविले असून, ही बाब बँकेसाठी अभिमानास्पद आहे. या उत्कृष्ट कामगिरीबद्दल सर्व सभासद व ग्राहकांचे अभिनंदन करण्यात आले.

वाढत्या डिजिटल व्यवहारांच्या पार्श्वभूमीवर ऑनलाइन फसवणुकीपासून सावध राहण्याचे आवाहनही करण्यात आले. बँक कोणत्याही ग्राहकाला फोन करून ओटीपी, एटीएम पिन, पासवर्ड किंवा खात्याची गोपनीय माहिती विचारत नाही. त्यामुळे फसवे फोन, संदेश किंवा लिंकवर विश्वास ठेवू नये आणि कोणतीही गोपनीय माहिती इतरांना देऊ नये, असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या शेवटी बँकेच्या विविध ठेवी, कर्ज व ग्राहकाभिमुख योजनांची माहिती देण्यात आली. उपस्थित सभासदांनी कार्यक्रमाचे स्वागत करत बँकेच्या ग्राहकहिताच्या उपक्रमांचे कौतुक केले.

### व्यावसायिकांकडून घरगुती गॅसचा सर्रास वापर

चहाटपऱ्यांवर धडक कारवाई करण्यात आली होती. त्या कारवाईनंतर धास्तावलेल्या व्यावसायिकांनी काही काळ व्यावसायिक सिलेंडरचा वापर सुरू केला होता. मात्र काही दिवस उलटताच पुन्हा परिस्थिती मजैसे थेफ झाली. शहरातील मुख्य केंद्र असलेल्या नगरपालिका चौकातील विविध व्यावसायिकांनी पुन्हा एकदा घरगुती सिलेंडरचा अवैध वापर सुरू केला होता.शहरातील नगरपालिका चौकात पुन्हा घरगुती सिलेंडरचा व्यावसायिक वापर सुरू झाल्याची खात्रीशीर माहिती पुरवठा विभागाला मिळाली. या प्रकरणी तात्काळ दखल घेत जिल्हा पुरवठा अधिकारी कैलास पवार आणि तहसीलदार संभाजी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पुरवठा निरीक्षण अधिकारी शिरीष परदेशी, पुरवठा निरीक्षक किशोर भांदुर्गे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या पथकाने सोमवारी सायंकाळी नगरपालिका चौकात अचानक छापा टाकला. या धडक मोहिमेत नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यावसायिकांकडून तीन घरगुती गॅस सिलेंडर जप्त करण्यात आले. व्यावसायिकांनी घरगुती वापराच्या गॅस सिलेंडरचा वापर आपल्या प्रतिष्ठानात होणार नाही याची पूर्ण दक्षता घ्यावी. हा कायदेशीर गंभीर गुन्हा असून यापुढेही पुरवठा विभागाच्या वतीने शहरात अशी कारवाई सातत्याने सुरूच राहील. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांची गय केली जाणार नाही अशी माहिती शिरीष परदेशी (पुरवठा निरीक्षण अधिकारी, शहादा) यांनी दिली आहे.

पुरवठा विभागाने सोमवारी सायंकाळी ऐन गर्दीच्या वेळी केलेल्या या अचानक कारवाईमुळे अवैध गॅस सिलेंडर वापरणाऱ्या इतर व्यावसायिकांचे चांगलेच धाबे दणाणले आहेत. घरगुती गॅसचा तुटवडा रोखण्यासाठी आणि काळाबाजार थांबवण्यासाठी प्रशासनाने घेतलेल्या या कडक भूमिकेचे शहरातील सर्वसामान्य नागरिकांकडून स्वागत केले जात आहे.

### शिरपूरच्या सत्तर बीएलओंना नोटीस

सखोल पुनरिक्षण कार्यक्रम एसआयआर २०२६ घोषित झालेला आहे. त्या अनुषंगाने मतदान केंद्र स्तरीय अधिकारी (बीएलओ) यांनी मतदारांचे घरोघरी जाऊन भेटी देऊन इएफ फॉर्म वाटप व संकलन ३० जून ते २९ जुलै या कालावधीत पूर्ण करणेबाबत सूचना दिल्या आहेत. मात्र तालुक्यातील एकूण ७० मतदान केंद्र स्तरीय अधिकारी यांनी मतदारांना इन्यूमरेशन फॉर्मचे ऑफलाईन किंवा ऑनलाईन वाटप अद्याप केलेले नाही असे निर्देशनास आलेले आहे. भारत निवडणूक आयोगाचा व मतदार यादीचा कार्यक्रम हा कालमर्यादीत असल्याने सदर कामांत ७० मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांनी हेतपुरस्कर टाळाटाळ केलेली असून कर्तव्यांत कसूर केलेली आहे. म्हणून मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांचेविरुद्ध लोकप्रतिनिधीत्व आधिनियम १९५१ मधील तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यांत येऊ नये? याबाबतच्या लेखी नोटीसा मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांना देण्यात आलेल्या आहेत.

### नंदुरबारला जाणाऱ्या बसला भरघाव

सुरू केले. गावकऱ्यांनी बसमधील प्रवाशांना सुखरूप बाहेर काढत मोठा अनर्थ टाळला. जखमी चालकाला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. अपघातानंतर काही काळ परिसरात वाहतूकही विस्कळीत झाली होती.

चिमठाणे ते सोनगीर या मार्गावर राष्ट्रीय महामार्गाचे काम अनेक महिन्यांपासून सुरू आहे. मात्र, कामाची गती अत्यंत संथ असून अनेक ठिकाणी रस्ता अपूर्ण अवस्थेत आहे. पावसाळ्यामुळे रस्त्यावर चिखल, खड्डे आणि निसरडी परिस्थिती निर्माण होत असल्याने या मार्गावर वारंवार अपघात होत असल्याची नागरिकांची तक्रार आहे.

### काळाराम मंदिरामधून काँग्रेसचे आंदोलन

उद्या मंगळवार दि. ७ जुलैपासून राज्यभर आंदोलन केले जाणार आहे. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्या नाशिकच्या काळाराम मंदिरात सकाळी अकरा वाजता आंदोलनाचा शंखनाद केला जाणार आहे. या आंदोलनात प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष मोहन जोशी, नाशिक शहर काँग्रेस अध्यक्ष निलेश ऊर्फ बब्लू खैरे, नाशिक ग्रामीण उत्तरचे जिल्हाध्यक्ष रमेश कहांडोळे, दक्षिणचे जिल्हाध्यक्ष भरत टाकेकर यांच्यासह शेकडो पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर ९ जुलै ते १४ जुलै दरम्यान राज्यभर सर्व जिल्ह्यात रघुपती राघव राजाराम सत्याग्रह केला जाणार आहे. जिल्ह्याच्या ठिकाणी राम मंदिर, शिव मंदिर अथवा हनुमान मंदिरात हा सत्याग्रह केला जाणार आहे. मर्यादा पुरुषोत्तम प्रभू रामाच्या नावावर पैसे खाणाऱ्या भाजपा, आरएसएसच्या लबाड लोकांना सुबुद्धी दे, अशी प्रार्थनाही यावेळी देवाकडे केली जाणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने दिली आहे.

### भरधाव ट्रकची धडक मो.सायकलस्वार ठार

राज अशोक कुवर (वय २६) यांनी दिलेल्या तक्रारीवरून ट्रक (केए ४१/एमई-६८४३) चालक गंगाराम दुर्गाराम (रा. बंगळुर, कर्नाटक) याच्याविरुद्ध निष्काळजी व भरधाव वाहन चालवून मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

### दोंडाईचा रेल्वे स्थानकावर परप्रांतीय मजुराची लुट

धुळे, दि.६- मजुरीसाठी आलेल्या परप्रांतीय मजुरास दोंडाईचा (ता.शिंदखेडा) येथील रेल्वे स्थानकावर चाकूचा धाक दाखवून मोबाईलसह वीस हजार रुपयांची लुटमार केल्याची घटना घडली.

छत्रपाल रामप्रीत चव्हाण (वय १४) रा. शांतीनगर मीर पुर ता.नबाजगंज जि. बारबंकी, उ. प्रदेश असे मजुराचे नाव आहे. मिस्त्री कामासाठी तो आला होता. शनिवारी रात्री दहाच्या सुमारास दोंडाईचा रेल्वे स्थानकाजवळील रस्त्यावरून तो जात होता. लुटमार करणारे दोन जण आले, त्यांनी चाकूचा धाक दाखवून छत्रपालला हाताबुक्यांनी मारहाण केली. त्याच्याकडील १७ हजार रुपयांचा मोबाइल, तीन हजारांची रोकड लुटून नेली. याप्रकरणी दोंडाईचा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

## पान १ वरुन

### मनपा पंधरा जुलै नंतर शास्ती आकारणार

पर्यंत सहा टक्के सुट देण्याचे जाहिर केले आहे. त्यानुसार महापालिकेत भरणा करण्यास नागरिकांनी सुरूवातही केली आहे. काही थकबाकीदारांनी अद्यापही करभरणा केलेला नाही. मालमत्ताकराची बीले वाटपाचे काम वसुली विभागाकडून केले जात आहे. दि.१६ जुन ते दि.१५ जुलै २०२६ हा शास्तीमाफीचा शेवटचा टप्पा असणार आहे. दि.१६ जुलै २०२६ पासून मालमत्ताधारकांना देण्यात आलेल्या बिलांवर दोन टक्के शास्ती आकारली जाणार आहे. महापालिकेने आता पर्यंत १४.५ कोटी वसुली केली आहे. अशी माहितीही वसुली अधीक्षक मुकुंद अग्रवाल यांनी दिली आहे.

### साक्री प्रवासी संघला यश

रोजी प्रवासी महासंघाचे पदाधिकारी प्रा.डी व्ही सोनवणे, प्राचार्य पी एस सोनवणे, यांनी नंदुरबार आगार प्रमुख संदिप निकम यांना भेटून निवेदनातील मागणीचा पाठपुरावा केला. नंदुरबार आगार प्रमुख संदीप निकम यांनी वरील मागणी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडून मंजूर करून घेऊन वाहक चालक यांना लेखी सूचना देऊन कासारे फाठ्या जवळ बस थांबून प्रवासी चढ-उतार करणे अशा सूचना दिल्या. आता कासारे फाट्यावर एस टी बसेस थांबतील. साक्री तालुका प्रवासी महासंघाचे सर्व पदाधिकारी सदस्य कार्यकर्ते यांच्या कार्याला यश प्राप्त झाले आहे. प्रवाश्यांची गैरसोय होणार नाही. फाट्यांवर गावाच्या नावाचे फलक लवकरच लावले जातील. अशी माहिती साक्री तालुका प्रवासी महासंघाचे अध्यक्ष सुरेश पारख यांनी दिली.

### आधुनिक कार्डीयाक केअर रूग्णवाहिका

निधीची तरतूद झाल्याची माहिती आहे. अद्याप या निधीचा वापर करून रूग्णवाहिका उपलब्ध करण्यात आलेल्या नाहित.

नागरिकांच्या आरोग्याच्यादृष्टीने जिल्हा नियोजन मंडळाच्या मंजूर निधीतून दोन अत्याधुनिक कार्डीयाक केअर रूग्णवाहिका तातडीने खरेदी करून द्याव्यात. अशी मागणी एमआयएमचे नगरसेवक मिर्झा शोएब नवाब बेग यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

### आत्महत्येस प्रवृत्त केले; गुन्हा दाखल

आईने दिलेल्या तक्रारीनुसार संशयित बादलमाळी याच्याविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल झाला. पोलीस निरीक्षक भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक राठोड तपास करीत आहेत.



### शिक्षणातज्ञ डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जींचे बलिदान बहुमूल्य - अल्पा अग्रवाल

**धुळे, दि.६ - डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी हे प्रखर राष्ट्रवादी विचारवंत, शिक्षणतज्ज्ञ आणि भारतीय जनसंघाचे संस्थापक होते. देशाची एकात्मता आणि अखंडतेसाठी त्यांनी दिलेले सर्वोच्च बलिदान आणि त्यांचे योगदान भारताच्या इतिहासात अत्यंत महत्त्वपूर्ण आहे, असे प्रतिपादन भारतीय जनता पक्षाच्या बेटी बचाव-बेटी पढावच्या प्रदेश सहसंयोजिका अल्पा अनुप अग्रवाल यांनी केले.**

शहराचे आमदार अनुपभैया अग्रवाल यांच्या येथील मालेगाव रोडवरील जनसंपर्क कार्यालयात आज सकाळी जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम झाला, त्यावेळी सौ. अग्रवाल बोलत होत्या. सौ. अग्रवाल यांनी डॉ. मुखर्जी यांच्या प्रतिमेचे पूजन करत पुष्पहार अर्पण केला. यानंतर त्यांना आदरांजली वाहण्यात आली.

सौ. अग्रवाल म्हणाल्या, की राष्ट्रीय एकतेसाठी प्राणाची आहुती देणारे, भारतीय जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांचे विचार, त्याग आणि राष्ट्रनिष्ठा आजही प्रत्येक देशभक्तासाठी प्रेरणादायी आहे. एक देश एक संविधान एक प्रधान! या विचारासाठी दिलेला त्यांचा संघर्ष भारताच्या एकतेचा आधारस्तंभ ठरला. स्वातंत्र्यानंतर जम्मू-काश्मीरला कलम ३७० मुळे मिळालेल्या विशेष दर्जाला त्यांचा तीव्र विरोध होता. या तरतुदीमुळे देशाच्या सार्वभौमत्वाला धोका निर्माण होईल, अशी त्यांची धारणा होती. त्या काळी काश्मीरमध्ये प्रवेश करण्यासाठी भारतीयांना परवाना घ्यावा लागत असे. डॉ. मुखर्जी यांनी ११ मे १९५३ रोजी या परमिट व्यवस्थेचे उल्लंघन करून काश्मीरमध्ये प्रवेश केला, तिथे त्यांना अटक करण्यात आली आणि २३ जून १९५३ रोजी नजरकैदेत असतानाच त्यांचे संशयास्पद स्थितीत त्यांचे निधन झाले. त्यांनी दिलेला राष्ट्रीय एकात्मतेच्या विचाराचा अंगीकार करत प्रत्येक भारतीयाने वाटचाल करण्याची गरज असल्याचे आवाहनही सौ. अग्रवाल यांनी केले.

यावेळी भारतीय जनता पक्षाचे महानगर जिल्हा सरचिटणीस शशी मोगलाईकर, महानगर जिल्हा उपाध्यक्ष अजय अग्रवाल यांच्यासह आमदार कार्यालयातील सर्व सहकारी उपस्थित होते.

### निधन वार्ता

**हरिचंद्र सोनवणे**

धुळे, दि.६- शहरातील देवपूर पंचवटी परिसरातील रहिवासी हरिचंद्र जगन्नाथ सोनवणे यांचे अल्पशः आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ७४ वर्षांचे होते. त्यांची अंत्ययात्रा दि.७ जुलै रोजी काढण्यात येणार आहे. प्रदीप सोनवणे, निलेश सोनवणे यांचे ते वडील होत.



### ४९ वे पुण्यस्मरण



कै. ईश्वरसिंग ग्यानी

तुमच्या पावन स्मृतीस भावपुर्ण श्रध्दांजली व सुमनांजली

✻ शोकाकूल ✻

✻ ईश्वर स्पोर्टस अँड सायंटीफीक, धुळे

✻ ईश्वर पेंटस्, धुळे.

✻ राजमाता पेंटस्, धुळे.

**Requirements:**

**Position : District Sales & Marketing Executive**

- Experience in AAC Blocks/Construction Material/Cement Industry
- Own Two-Wheeler & Valid Driving Licence
- Strong Sales & Customer Handling Skills
- Ability to Achieve Sales Targets

Location : Dhule District

**Salary : Attractive+Incentive**

**Contact/WhatsApp: 9226817232**

**भाड्याने देणे आहे**

नवतेज बाजार समोर कालीका प्रोव्हीजन जवळ देवपूर तीन रुमचे स्वतंत्र घर कंपनीस, ऑफिस, फॅमेलीस भाड्याने देणे आहे.

– संपर्क –

8055404946

8421461410

**किडनी रोग तज्ञ**

**डॉ.ललित देसले**

डी एम (नेफ्रॉलॉजिस्ट) किडनी रोग तज्ञ

– ओपीडी वेळ –

सकाळी – १० ते २

संध्याकाळी– ४ ते ६

ठिकाण –

ओम हॉस्पिटल, अग्रवाल नगर, मालेगाव रोड, धुळे.

– संपर्क –

02562-241313, 283318

9881116734

9890038308

**डिटीपी ऑपरेटर पाहिजेत**

इनडिझाईनमधे काम करु शकणारा डिटीपी ऑपरेटर चांगल्या पगारावर नेमणे आहे.

–: संपर्क :–

दै.आपला महाराष्ट्र

9422286496

**पाहिजेत**

कलर दुकानासाठी बिल बनवण्याकरीता मुलगी/महिला पाहिजेत.

बाबजी पेंट्स, देवपूर, धुळे

9730255252

8766771033

**जागा विकणे आहे**

भरत नगर फ्लॅट नं.९ साईज ३६५० स्क्वे. फूट विकणे आहे

-: संपर्क :-

9422774591

**पाहिजेत**

कामासाठी पाहिजे

सेल्समन – २

सेल्सगर्ल – २

श्याम वॉच अँण्ड गिफ्ट सेंटर

फुलवाला चौक, धुळे

7219036785

9960777594

New Models

ऑफर .... ऑफर .... ऑफर ....

Authorised Dealer

LG Panasonic Godrej



2026 New Model + Upto 30% डिस्काउंट + फ्री वाढीव वॉरंटी + १०% पर्यंत इन्स्टंट डिस्काउंट क्रेडिट कार्डवर

0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.

आता मिळवा लेटेस्ट AC तेही 0% फायनान्स वर

**श्री महावीर इलेक्ट्रीक अँण्ड टी.व्ही.**

श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे, फोनः (02562) 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०